


# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक
प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ
प्रा. डॉ. दिलीप भिसे



Scanned by CamScanner

# जागतिकीकरण आणि लोकसाहित्य

संपादक

प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ    प्रा. डॉ. दिलीप भिसे

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

१. लोकसाहित्यातील समाजजीवन एक अभ्यास । ११
– प्रा. डॉ. सिंधू सोलापूरे

२. लोकसाहित्याची भाषा : संशोधकांपुढील आव्हाने । १७
– डॉ. सुनीता उग्रस्कर

३. लोकसाहित्याची समीक्षा । २५
– डॉ. नवनाथ नारायणराव गोरे

४. लोकसाहित्यातील विनोद । ३१
– प्रा. डॉ. अर्चना चव्हाण

५. लोकसाहित्यातील लोककलाविष्कार । ३६
– प्रा. तुषार ज्ञानेश्वर पाटील

६. आदिवासी लोकसाहित्यातून व्यक्त होणारा निसर्ग । ४५
– प्रा. डॉ. र. तु. देशमुख

७. लोकसाहित्य आणि अन्य ज्ञानशाखा : परस्परसंबंध । ५०
– प्रा. एस. के. परदेशी

८. लोकसाहित्याच्या अध्ययनाचे महत्त्व । ५५
– डॉ. खाडप संजय बाबुराव

९. 'नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतून प्रकटलेल्या लोकसाहित्यिक घटकांचा आविष्कार' । ६१
– श्री. सुनील अंबादास आहिरे, डॉ. किरण नामदेव पिंगळे

१०. लोकसाहित्य : संकल्पना व स्वरूप । ६९
– प्रा. अंगद श्रीपती भुरे

११. लोकसाहित्य, उगम अर्थ व स्वरूप । ७५
– प्रा. लक्ष्मण वसंत भागवत

१२. लोकनाट्य : स्वरूप व परंपरा । ८०
– प्रा. सीता लक्ष्मण केंद्रे

१३. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व । ८४
– डॉ. योगेश शेळके



Scanned by CamScanner

१४. लोकसाहित्यातून प्रकट होणारे नाशिक जिल्ह्यातील प्रमुख लोकोत्सव । ८९
– पंकज केवळ पवार, प्रा. पौर्णिमा बोडके
१५. आदिवासीतील परधान जमातीचे लोकसाहित्य । ९९
– प्रा. अजय मारोती पाटील, प्रा. डॉ. राजू मोतेराव
१६. लोकसाहित्याचे स्वरूप । १०७
– डॉ. विठ्ठल केदारी
१७. आदिवासी लोकसाहित्यातील म्हणींचे वाङ्मयीन मूल्य । ११२
– प्रा. डॉ. देविदास खोडेवाड
१८. लोकसाहित्य अभ्यासाची अपरिहार्यता । ११८
– डॉ. सचिन सि. रूपनर
१९. लोकसाहित्य : परंपरा व स्वरूप । १२४
– प्रा. डॉ. रामहारी मायकर
२०. लोकसाहित्य : उगम, अर्थ व स्वरूप ।१२८
– श्री. सचिन दिलीप अहिरे
२१. मराठी बोली भाषांमधील म्हणींचा : तौलनिक अभ्यास । १३६
– प्रा. नामदेव महादू गावित
२२. भारतीय लोकसाहित्यातील आदिवासी लोकनृत्याचा समाजशास्त्रीय अभ्यास । १४१
– डॉ. संजय गंगाराम सुरेवाड
२३. लोकगीतातून व्यक्त होणारे स्त्री मन । १४७
– डॉ. सारिका अशोकराव बुरगे
२४. मायरान : गावकुसाबाहेरील शेतीनिष्ठ लोकसाहित्याचे मूल्ये सांगणारी संजीवकुमार भोसले यांची कविता । १५४
– प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे
२५. लोकसाहित्यातील समाजजीवन । १६२
– श्री. अभिषेक राजेंद्र परब
२६. लोकसाहित्य उगम, अर्थ व स्वरूप । १६७
– प्रा. डॉ. एम.आर. मोरे
२७. लोकगीताचे स्वरूप व वैशिष्ट्ये । १७३
– डॉ. शिवदास झेड. शिरसाठ, प्रा. डॉ. बाबासाहेब सुखदेव जाधव



Scanned by CamScanner

# लोकसाहित्य अभ्यासाची अपरिहार्यता

डॉ. सचिन सि. रूप
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मं
मु. पो. मंचर ता. आंबेगाव, जि. पु

**प्रास्ताविक :**

लोकसाहित्य हे लोकमानसाचे संचित आहे. त्यातून लोकमानसाचा अधि मुक्तपणे आविष्कार झालेले असतो. लोकजीवनातील सण, उत्सव, रुढी, परंपरा, श्रद्धा अंधश्रद्धा, जादुटोणा, मंत्र-तंत्र, विधिविधाने, लोककला यांचे समर्थ असे दर्श लोकसाहित्यातून घडते. म्हणून लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा संबंध निकटच असल्याचे दिसून येते. लोकसाहित्याचा अभ्यास करताना लोकजीवनाचे दर्शन घडते त लोकजीवनाचा अभ्यास करताना लोकसाहित्याची मदत घ्यावी लागते.

काल प्रवाहात ज्ञानाच्या कक्षा वाढत गेलेल्या आहेत. त्यातूनच ज्ञानविज्ञानाच्य विविधशाखा अस्तित्वात येऊन विकसित होतात. याचा परिणाम म्हणजे भाषेचा अभ्यासकरताना वर्णनात्मक आणि ऐतिहासिक अशा दोन विभागात हा अभ्यास होत आला आहे. प्रमाणभाषाही येथे आधिक्याने विचारात घेतली गेली असली तरी आज मात्र कोणतीही भाषा, बोली श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते हे लक्षात घेऊन सामाजिक भाषाविज्ञान हे स्वतंत्र अभ्यास क्षेत्र आज अस्तित्त्वात आले आहे व त्यानुसार भाषेचा अभ्यास केला जात आहे. अशातच लोकसाहित्याची निर्मितीही काही नवीन नाही. परंपरेने चालत आलेला हा सामूहिक मनाचा आविष्कार, त्या मागील पूर्वपीठिका, त्यांच्या निर्मितीमागील प्रयोजने आणि कालप्रवाहात बदलत जाणाऱ्या जीवनसंदर्भात त्याचा अर्थ शोधत मानवीजीवन अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न करता येईल. त्यातूनच लोकसाहित्य अभ्यासाची अपरिहार्यता निर्माण झाली आहे असे म्हणता येईल.

**लोकसाहित्यअभ्यासाची अपरिहार्यता:**

या लोकसाहित्याच्या अध्ययनाची सुरुवात ब्रिटिश अमदानीत झालेली दिसते. प्रारंभी धर्मप्रसारासाठी मिशनऱ्यांनी आणि नंतर आपणाला ज्या देशावर म्हणजेच एतदेशियांवर राज्य करावयाचे आहे, त्यांची संस्कृती, लोकमानस, परंपरा, प्रथा, रीतिरिवाज जाणून घेण्याच्या उद्देशाने या अभ्यासास प्रारंभ झाल्याचे आढळते. कोणत्याही ज्ञानक्षेत्राचा



Scanned by CamScanner

अभ्यास करताना अभ्यासकाच्या मनात एकच एक हेतू असत नाही. लोकसाहित्य ही समूहमनाची निर्मिती असून तिचा एकच एक निर्माता/कर्ता नसतो आणि त्याच्या निर्मितीशीही तसा संबंध शोधण्याचा प्रयत्न करीत नाही. डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, 'अंगाई गीत म्हणून बाळाला झोपविणाऱ्या आईला ते गीत कुणी आणि केव्हा रचले, त्यात कोणकोणत्या कल्पना ग्रथित केलेल्या आहेत इत्यादी प्रश्नांशी काहीच कर्तव्य नसते, ते गाणे म्हटल्याने बाळ झोपते अशी तिची कल्पना असते. जोपर्यंत तिला बाळाला झोपविण्याच्या कामी त्या गाण्याचे साहाय्य होते असे वाटेल तोपर्यंत ती ते गाणं म्हणत राहणार व ज्यावेळी गाण्याचा उपयोग होत नाही असे वाटेल त्यावेळी अन्य उपाय शोधणार.' मांडे यांची ही भूमिका लोकसाहित्याच्या संदर्भात मूलगामी अशीच आहे. सर्वच लोकसाहित्य प्रकारासंदर्भात हे लागू पडते.

**लोकसाहित्य अभ्यास आणि सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ :**

लोकसाहित्यातील लोककथा, लोकगीते, लोककथागीते, विविध विधी, परंपरा, रूढी, संकेत, श्रद्धा, अंधश्रद्धा, समजुती आणि यासारख्या विविध गोष्टींना समाजजीवनात असे कोणते महत्त्वाचे स्थान असते ज्यामुळे हे सर्व लोकसमूहात, लोकमानसात चिरंतन टिकून राहते याचा शोध घेण्याच्या उद्देशाने लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. मात्र हा अभ्यास करत असताना या अभ्यासात सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेणे गरजेचे ठरते.

**लोकसाहित्य अभ्यास आणि संस्कृतीचे सातत्य :**

लोकसाहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकपरंपरेने संक्रमित होते. असे संक्रमण होत असले तरी ते जसेच्या तसे होत नसते. त्यात कालानुरूप बदल होत असतात. त्यामधील जुने काही काढून किंवा नवे काही समाविष्ट करून तो ठेवा पुढच्या पिढीला सुपूर्द केला जातो. त्यादृष्टीने लोकसाहित्य हे पूर्णपणे नवेही नसते आणि पूर्णपणे जुनेही नसते. ते नव्या-जुन्याच्या उंबरठ्यावर असते. लोकसाहित्याच्या शास्त्रीय अभ्यासात संक्रमित झालेल्या आशयवस्तूचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाचे ठरतात. फ्रान्झ बोआस यांनी ज्या बाबी लोकांना त्यांच्या जीवनाच्या संदर्भात महत्त्वाच्या वाटतात त्याच ते पुढील पिढीला संक्रमित करतात यावर भर देऊन लोकसाहित्याच्याद्वारे संस्कृतीचे सातत्य टिकते हे पटवून दिले आहे. या त्यांच्या वैशिष्ट्यांमुळेच संस्कृतीच्या सातत्याचा अभ्यास करता येऊ शकतो, हेही दर्शविले आहे.' फ्रान्झ बोआस यांची ही भूमिका सर्वच लोकसाहित्याला लागू पडणारी नाही. कारण लोकांना त्यांच्या जीवनाच्या संदर्भात ज्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात त्याच ते पुढील पिढीला संक्रमित करतात.



Scanned by CamScanner

लोकसाहित्यामुळे संस्कृतीचे सातत्य टिकून राहण्यास कशी मदत होते हे जा घेण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**लोकसाहित्य अभ्यास आणि पारंपरिक जनसंपर्क माध्यमे :**

आजच्या या विविध नियतकालिके, आकाशवाणी, दूरदर्शन, पुस्तके, दूरध्व भ्रमणध्वनी, इंटरनेट, Youtube, whatsapp अशा आधुनिक जनसंपर्क माध्यमा युगाच्या तुलनेत कोणतीही सुविधा नसलेल्या प्राचीन मध्ययुगीन काळात भजनक कीर्तनकार, गोंधळी, वाघ्या-मुरळी, व्होरा सांगणारा जोशी, लळित, पिंगळा, वासुदे दशावतार बहुरूपी, नंदीबैलवाले यासारख्या विविध लोकाविष्कार करणाऱ्या, संस्थां लोकसंपर्काच्या माध्यमातून जनसंपर्काचे व समाजप्रबोधनाचे कार्य कशा प्रकारे के आहे? त्यात कालानुरूप कशाप्रकारे परिवर्तने होत गेली? हेही जाणून घेण्यास व त्या स्वरूप माहिती होण्यासाठी हा लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**लोकसाहित्यअभ्यास आणि पारंपरिक लोककला :**

लोकसाहित्यात विविध प्रयोगात्म लोककला आहेत. त्यांचे स्वरूप पाहत आधुनिक कालखंडातील सिनेमा, नाटक वा इतर प्रायोगिक कलांवर पारंपरिक लोककलांचा झालेला परिणाम व आधुनिक कलांचा त्यांच्यावर झालेला परिणाम तपासता कोणकोणते बदल झाले ते कळण्यास हा अभ्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, भारूड, गोंधळ, दशावतार, लळित इत्यादींचे सादरीकरण, त्यांची चाल, ठेका, लय, त्यातील अभिनय, त्यांची वेशभूषा, त्यातील धार्मिक संदर्भ आणि आजच्या काळातील अनेक ज्वलंत विषय घेऊन सादर होणारी भारुडे, गोंधळ, दशावतार, लळित यांचा अनुबंध तपासता येईल.

**लोकसाहित्य अभ्यास आणि कल्पनाबंध व लोकमानस :**

लोकसाहित्य हे लोकमानसाचा सामूहिक आविष्कार असल्याकारणाने त्यातून लोकरंजन तर असतेच पण काही वेळेस लोकरंजनातून प्रबोधन केलेलेही आपणास आढळून येते. या साहित्यातून कधी सुख-दुःखे प्रगट केलेली असतात तर कधी माणसाच्या अतृप्त इच्छा, आशा-आकांक्षा या गोष्टी उघडपणे प्रतिबिंबीत झालेल्या असतात. त्याच भावभवना कधी सूचकतेने व्यक्त होतात तर कधी प्रतीकात्मकतेने अप्रत्यक्षपणे येतात. सातत्याने येणारे कल्पनाबंध मनोविश्लेषणवाद्यांच्या माध्यमातून तपासले तर त्यामागील समाजमन कळण्यास मदत होईल. लोकसाहित्यात समाविष्ट असणार्याल विविध लोककथा, लोकगीते, लोककथागीते, विधिविधाने यातून एक पारंपरिक मन जपले जाते. सण-उत्सवाच्या निमित्ताने म्हटली जाणारी स्त्रियांची गाणी, पहाटेच्या वेळी दळण-कांडण करताना गायल्या जाणाऱ्या जात्यावरील ओव्यातून



Scanned by CamScanner

स्त्रियांच्या सोशिक मनाचे व त्यांनी सहन केलेल्या व्यथा, वेदना, त्यांच्या मनातील अव्यक्त अशा वेगवेगळ्या मनोभावना यांचे प्रतिबिंब पडलेले पाहावयास मिळते. म्हणून तर अनेक स्त्रीगीतातून श्रीकृष्णाला भावाची उपमा दिल्याचे दिसते. सासर-माहेर, संसार करत असताना निर्माण होणारे विविध नातेसंबंध व त्यांच्याशी निगडीत स्त्रीगीतातून त्यांचे अंतर्मन उलगडले जाते. देव-देवतांच्या पूजापठनातून, यात्रांमधून म्हटल्या जाणाऱ्या गीतातून एक प्रकारे समूहभावना व्यक्त होते. त्यामुळे समजात वावरताना कोणत्या व्यक्तीशी कसे वागले पाहिजे याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे, कळत-नकळत धडे दिले जातात. एकूणच काय तर लोकसाहित्याच्या माध्यमातून जे संस्कारक्षम लोकमानस तयार करण्याचे कार्य घडते ते सविस्तर जाणून घ्यायचे असेल तर त्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

**लोकसाहित्य अभ्यास आणि सजीवावशेष :**

लोकसाहित्याचे सजीवावशेषत्व जाणून घेण्यासाठीही लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. मानववंशशास्त्राच्या मदतीने हे तपासता येणे शक्य आहे. लोकसाहित्यात टिकून राहण्याला महत्त्व असते, टिकून राहते म्हणूनच ते जिवंत असते. लोकसाहित्य हे कालप्रवाहात बदल स्वीकारते म्हणूनच ते जिवंत राहते. बदल कसे होतात हे जाणून घेण्यासाठी आणि सजीवावशेष तपासण्यासाठी लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. लोकसाहित्यातील लोक हा विशिष्ट जाती, वर्ग, परिसर यांनी सीमित नसतो. विशिष्ट विचारप्रणाली तत्वे, भाषा अशा काही तत्त्वांनी एकत्रआलेला लोकसमूह असतो. माणूस हा थोड्याफार फरकाने सर्वत्र सारखाच असतो. हे अनेक गोष्टीवरून पटण्यास मदत होते. साहजिकच लोकसाहित्य हे मानवी एकतेचे एक साधन आहे हे पटण्यास मदत होते. गंगाधर मोरजे या संदर्भात म्हणतात, लोकसाहित्य हे विशिष्ट वर्गाची वा सामाजिक स्तराची मालमत्ता नाही व पूर्वीही नव्हती. त्यामुळे 'माणूस' एकत्र आणण्यासाठी लोकसाहित्य उपयुक्त साधन ठरू शकेल.'[१] लोकसाहित्याच्या शास्त्रीय आणि सैद्धांतिक मांडणीतून लोकसाहित्य मानवी एकतेचे साधन कसे आहे ते सिद्ध करता येऊ शकेल.

**लोकसाहित्य अभ्यास आणि नीतिशिक्षण :**

समाजजीवन सुरळीत आणि सुरक्षित चालण्यासाठी नीतिशिक्षणाची, सारासार विवेक शिकविण्याची-शिकण्याची गरज निर्माण होते. लोकसाहित्य हे अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडत असल्याचे दिसून येते. भारूड, भजन, कीर्तन या लोकाविष्कारातून हे सहजरीत्या प्रत्ययाला येते.लोकसाहित्य हे लोकमानसाचा भावनिक आविष्कार असल्याने त्यात लोकसमूहाचा प्रत्यय येतो. व्यक्तिगत सुख-दुःखे, राग-



Scanned by CamScanner

लोभ, आपरभाव येथे गळून पडतो. एकटेपणाची जाणीव काही काळ का होईना मग दूर होण्यास मदत होते. त्यामुळे सर्व लोक आपलेपणाच्या धाग्याने एकत्र बांधले जातात. हा आपलेपणा कसा निर्माण होतो ते जाणून घेण्यासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासाची गरज आहे. लोकसाहित्यातील बोधकथा, प्राणीकथा, नीतिकथा यांच्या माध्यमातून समाजाला नीतिशिक्षण देण्याचे उत्तम कार्य घडते. त्यामुळे आज लोकसाहित्यातून आपणाला अनौपचारिक शिक्षणाचे धडे मिळतात असे म्हणावे लागते. तसेच नीतिशिक्षणही मिळते. मानवी जीवनातील चांगल्या गोष्टींचे चांगले परिणाम आणि वाईट गोष्टींचे वाईट परिणाम सर्वांना पटत असूनही समाजजीवनात काही वाईट प्रवृत्ती डोके वर काढीत असताना अशा वेळी लोकमानसात प्रचलित असलेल्या या लोककथा, कथागीते प्रत्याप्रत्यक्षपणे नीतिशिक्षणाचे धडे देतात. त्याचे स्वरूप कळण्यास लोकसाहित्याची मदत होईल. लोकसाहित्यात भाषिक, प्रादेशिक स्तर भेद फारसे नसतात. समूहमनाच्या वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक पार्श्वभूमीवर लोकसाहित्याची निर्मिती होत नसल्याने भाषेच्या विविध स्वरूपाचे प्रकटीकरण होत असते. त्यामुळे प्रादेशिक भाषा, बोलीभाषा, ग्रांथिक भाषा या पातळ्यांवर विविध मतमतांतरे आढळतात. लोकसाहित्यातील एकात्म आविष्काराचा विचार करता लोकसाहित्य हे भाषिक सामंजस्य वाढविण्यास साहाय्यभूत ठरेल, असे वाटते. लोकसाहित्याचा अभ्यास हा केवळ भूतकाळातील गोष्टी पुन्हा जागविण्यासाठी करायचा का? तर तसे निश्चितच नाही. लोकसाहित्यातील सर्वच स्वीकारार्ह आहे, असेही नाही. मात्र लोकसाहित्याच्या या परंपरा समजून घेत, त्यातील बदलांचा परामर्श घेत जे टाकाऊ असेल त्याचा पुनर्विचार मांडणे, योग्य असेल ते पुढील काळात कसे सक्षमपणे मांडता येईल याचा विचार करणे यासाठी लोकसाहित्य निश्चितच उपयुक्त ठरेल, यात शंका नाही. याबाबत र.ता. भोसले म्हणतात, लोकमानस जाणून घेण्यासाठी, तत्कालीन काळ समजण्यासाठी, त्यावेळचे लोकजीवन समजून घेण्यासाठी लोकसाहित्याशिवाय पर्याय नाही.'

**सारांश:**

लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे संस्कृतिक व वाङ्मय क्षेत्राला अभ्यासाची प्रेरणादायी दिशा मिळू शकते. संस्कृतीचे सातत्य टिकण्यास मदत होते. त्यातून सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ तपासता येऊ शकतात. लोकसाहित्य हे समूहमनाचा आविष्कार असते. व्यक्तिगत सुख-दुःखापेक्षा समूह भावनेला महत्त्व असते. त्यातून कुटुंबसंस्था आणि सामाजिक संस्था यांना आकार प्राप्त होत असतो. अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून लोकसाहित्याची प्रचिती येते. लोकसाहित्य नीतिशिक्षण देत असल्याने समाजाला विधायक वळण लावण्यात, एकाच वेळेला



Scanned by CamScanner

गोष्टीचा, मताचा, विचाराचा प्रचार व प्रसार करण्यास त्याची मदत होऊ शकते. समूहमनाचे होणारे विघटन तपासता येते. एकूणच काय लोकसाहित्य हे केवळ भूतकाळ उगाळण्याचा भाग नाही तर त्या परंपरेचा वेध घेण्याची क्षमता निर्माण होऊ शकते का ते तपासण्याचा पर्याय आहे? म्हणूनच लोकसाहित्याचा अभ्यास अपरिहार्य आहे हे निश्चित.

या अभ्यासमुळे विविध स्तरावरील व क्षेत्रातील लोकांच्या जीवनाचे सांस्कृतिक, सामाजिक व भाषिक स्वरूपाचे पारंपरिक, वर्तमान व परिवर्तनात्मक दर्शन घडणे शक्य होऊन भविष्यकाळाचा वेध घेण्यासाठी काही प्रमाणात मदत होईल त्याद्वारे संस्कारक्षम मन तयार करता येते. तसेच सामाजिक, राजकीय, आर्थिक, औध्योगिक, कृषिविषयक अशा इतरही काही क्षेत्रातील चळवळींना या अभ्यासातून एक वेगळी दिशा मिळू शकेल. तसेच ग्रामीण व आदिवशी भागातील लोकांच्या परंपरा, संस्कृती, समजूती, त्यांचे स्त्रीजीवन, कृषिजीवन यांचाही परिचय आणि अभ्यास करणे सहजशक्य होईल.

संदर्भग्रंथ :

१. मांडे, प्रभाकर : 'लोकसाहित्याचे स्वरूप, 'सविता प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, १९८९, पृ.३२.
२. तत्रैव : पृ.३६.
३. मोरजे, गंगाधर : 'लोकसाहित्य एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, 'दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९३, पृ.०६.
४. भोसले, पांडुरंग, मोराळे, महालक्ष्मी (संपा.) : 'वेध लोकसाहित्याचा,' सायन पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, ५ नोव्हेंबर, २०१८ पृ.१३.



Scanned by CamScanner